Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

भारतीय संविधानातील 73 व्या घटनादुरूस्तीमधील तरतुदी : एक अवलोकन

प्रा.डॉ. चंद्रशेखर ढोले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि.लातूर

भारतीय संविधानातील निती निर्देशक तत्वामध्ये, ग्रामपंचायतीच्या संदर्भात संविधानातील असे एक तत्व आहे की, ग्रामपंचायतीचे संघटन करण्यासाठी राज्यसरकार जबाबदारी घेणार आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचे घटक म्हणून काम करण्यास आवश्यक ती सत्ता व अधिकार बहाल करेल. भारतातील लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने संघ सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या संदर्भात बलवंतराय मेहता समिती 1957, अशोक मेहता समिती 1977, जी.व्ही. के. राव समिती 1985, एल.एम. सिंघवी समिती 1986 आणि महाराष्ट्र सरकारचा 1961 चा महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा या समित्यांच्या शिफारशी व 1961 च्या कायद्यानुसार महाराष्ट्रात पंचायत राज्य व्यवस्था अंमलात आली.

पण भारतीय लोकशाहीने सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यात देशातील अनेक राज्यसरकारचा उदासीनपणा, ग्रामपंचायत, जि.प. व पंचायत समित्यांची उदासीनता आणि असमाधानकारक कार्य त्यांच्या अवेळी होणाऱ्या निवडणूका, राज्य सरकारांचे त्यांच्या कार्यात होणारे अति हस्तक्षेप अशा अनेक अडचणीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थाना संरक्षण देणे, त्यांना बळकट आणि सक्षम करणे, महिला व दुर्बल घटकांना या संस्थामध्ये सहभागी होण्याची संधी देणे, यासाठी केंद्र सरकारने 22 डिसें 1992 रोजी पंचायत राज्य संस्थांना कायदेशीर दर्जा प्राप्त होणारी 73 वी घटनादुरूस्ती लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहात मंजुर करून घेतली. 73 व्या घटनादुरूस्ती मध्ये ज्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्यानुसार पंचायत राज्य संस्था आज बळकट झाल्या आहेत. विशेषतः महिला व ओबीसी यांना या संस्थामध्ये आरक्षण देण्यात आल्यामुळे त्याचा सहभाग पंचायत राज्य संस्थाच्या विकासात महत्वाचा ठरला आहे.

73 व्या घटनादुरूस्तीमधील तरतुदी :-

1) ग्रामसभा :- ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्व नागरीकांना ग्रामसभेचे सदस्यत्व देऊन ग्रामसभा स्थापन करण्यात आली. कलम 247 (अ) मध्ये ग्रामसभा स्थापन करणे आणि या ग्रामसभेमध्ये गावातील लोकांना त्यांच्या समस्या अडचणी मांडण्याच्या संधी मिळाल्या आहेत. महाराष्ट्रात 1 जानेवारी, 1 मे, 15 ऑगस्ट आणि 2 ऑक्टोबर ला ग्रामसभेचे आयोजन ग्रामपंचायत मार्फत केले जाते. ग्रामसभा आयोजित करण्याचे बंधन असल्यामुळे त्या नित्यनियमाने आयोजित केल्या जातात. ग्रामसभेमुळे गावातील लोकांना त्यांच्या प्रश्नासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. त्यामुळे ग्रामस्थ ग्रामसभेत उपस्थित राहून ग्रामसेवक, सरपंच व उपसरपंच आणि सदस्यांना गावाच्या समस्याविषयी प्रश्न विचारणे, त्यांना मनमानी कारभार न करू देणे यासाठी ग्रामसभा ही महत्वाची ठरत आहे.

2) त्रिस्तरीय पंचायतराज संस्था :- भारतीय राज्यघटनेतील कलम 243(ब) नुसार ग्रामपंचायत ग्रामस्तरावर पंचायत समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली आहे. या तिन्ही स्तरावरील लोकप्रतिनिधीची निवड ही प्रौढ मतदाराद्वारे प्रत्यक्षरित्या केली जाते. तसेच राज्य विधीमंडळाने ग्रामपंचायतीच्या सरपंचाना पंचायत समितीचे आणि पंचायत समितीच्या सभापतींना जिल्हा परिषदेचे पदसिध्द प्रतिनिधीत्व देण्यासंबंधीच्या तरतुदी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सरपंच आता थेट लोकांमधून निवडला जात आहे. 2017 पासून हा नियम लागू झाला आहे.

3) स्थानिक स्वराज्य संस्था : आरक्षणासंबंधाच्या तरतुदी :- कलम 243 (ड) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निर्वाचित जागामधील काही जागा अनुसूचित जाती व जमाती काही जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती व जमातीसाठी त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा आरक्षित असाव्यात तसेच एक तृतीयांश जागा त्या प्रवर्गातील महिलासाठी आरक्षित ठेवाव्यात अशा राखीव जागा असलेले मतदारसंघ चक्राकार पध्दतीने निश्चित करण्यात यावेत. या तिन्ही स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या जागामध्ये अनुसूचित जाती जमाती व महिलासाठी एक तृतीयांश पदे राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. ही पदे चक्राकार पध्दतीने निश्चित केली जातील.

4) स्थानिक स्वराज्य संस्थांचा कालावधी :- संविधानातील 243 (ई) नुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या तिन्ही संस्थाचा कालावधी पाच (5) वर्षांचा असेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. एखाद्या कारणामुळे या संस्था बरखास्त करण्यात आल्या असतील तर त्याच्या निवडणूका सहा महिन्याच्या आत घ्याव्या लागतात.

5) न्यायालयाच्या हस्तक्षेपास प्रतिबंध :- संविधानामधील कलम 243 (ओ) नुसार राज्य निर्वाचन आयोगाकडे नियमानुसार अर्ज किंवा तक्रार दाखल केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्याही निवडणूकीस न्यायालयामध्ये आव्हान कोणालाही देता येणार नाही.

6) राज्य वित्त आयोग :- संविधानामधील कलम 243 (आय) नुसार राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे. पाच वर्षे संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे मुल्यमापन करून शिफारशी करण्यासाठी संबंधीत राज्याचे राज्यपाल वित्त आयोगाची स्थापना करतील. महाराष्ट्र सरकारने 1994 मध्ये पहिल्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली होती.

या वित्त आयोगाची रचना, सदस्याच्या नियुक्तीसाठी पात्रता किंवा निकष, त्यांची निवड करण्याची पध्दती, यासंबंधीच्या तरतुदीसाठी राज्य विधीमंडळ कायदा करेल. वित्त आयोग राज्यसरकारला अनुदानासंबंधी शिफारशी करेल से नमुद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कलम 243 (आय) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेखा परिक्षणाचे हिशोब ठेवेल आणि त्याचे लेखा परिक्षण करेल.

7) राज्य निवडणूक आयोग :- संविधानातील कलम 243(क) नुसार राज्य निवडणूक आयोगासाठी काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यापुढील प्रमाणे आहेत.

1) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेणे, मतदार याद्या तयार करणे, देखरेख ठेवणे, आणि त्यावर नियंत्रण ठेवणे इ.

2) राज्यपाल राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्ताची पात्रता, सेवा, शर्ती, आणि कालखंड निश्चित करतील आणि त्यांची निवड करतील तसेच संबंधीत पदावरील नियुक्ती नंतर त्याच्या सेवा शर्ती आणि अन्य बाबतीत बदल करता येणार नाही.

3) राज्य निवडणूक आयोगाच्या विनंतीनुसार निवडणूकीसाठी आणि निवडणूक विषयक कामासाठी राज्यपाल आयोगास कार्ये करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध करून देतील.

8) जिल्हा नियोजन व विकास समिती :- 243 नुसार जिल्हा पातळीवर जिल्हा विकासासाठी जिल्हा नियोजन आणि विकास समिती स्थापन केली जाईल. ही समिती जिल्हयाच्या विकासाची जबाबदारी पार पाडेल.

निष्कर्ष :-

1) ग्रामपंचायतीलच्या हद्दीतील नागरिकांना ग्रामसंभेमुळे समस्या मांडण्यासाठी हक्कांचे व्यासपीठ मिळाले.
2) त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्था स्थापन झाल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होईल.
3) स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि ओबीसी ना आरक्षण मिळाल्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विस्तार झाला आणि समाजातील सर्व वर्गाचा या संस्थामध्ये राजकीय सहभाग वाढला.
4) स्थानिक स्वराज्य संस्थांना निश्चित कालखंड मिळाल्यामुळे काम करण्याची संधी मिळाली तसेच या संस्थाचे अधिकार आणि कार्य 73 व्या घटनादुरूस्तीने निश्चित केल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक योजना तयार करून त्याची अंमलबजावणी करतील.
5) 73 व्या घटनादुरूस्तीमध्ये राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे या वित्त आयोगाच्या अनुदानाचा फायदा या संस्थांना होत आहे.
6) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

संदर्भ :-

1) तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर- भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड - 1 द युनिक ॲकॅडमी प्रथम आवृत्ती जानेवारी - 2011
2) र. घ. वराडकर- भारतातील घटनात्मक आणि राजकीय प्रक्रिया - निराली प्रकाशन - पुणे
3) स्मिता जोशी- भारतीय संविधान राजकारण आणि कायदा पियर्सन प्रकाशन, दिल्ली.
4) दुर्गा दास बसू - भारतीय राज्यघटनेची ओळख लेक्सीस नेक्सीस प्रकाशन गुरगांव